# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

''(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक (द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)''

(विद्या विभाग)



छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी क्रमांक: कार्यालय: ०७१२–२५३२०६३ फॅक्स : ०७१२–२५५५७०१


क्रमांक विद्या/अ.म/वि.का.स/२०१८/642 दिनांक ०१/०८/२०१८

प्रति,

डॉ./श्री/श्रीमती......................................................

**मा. अध्यक्ष/समन्वयक व मा. सभासद,**
**संबधीत अभ्यासमंडळ/विशेष कार्य समिती,**
**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.**

विषय: ..........................................................................................अभ्यासमंडळ/विशेष कार्य समितीच्या तातडीच्या सभेचे सूचनापत्र व कार्यक्रम पत्रिका,

महोदय/महोदया,

मा.कुलगुरू महोदयांच्या आदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, आपल्या अभ्यासमंडळ/ विषयाअंतर्गत येणा–या अभ्यासमंडळ/विशेष कार्य समितीची, तातडीची सभा मा.अध्यक्ष/समन्वयक यांचे अध्यक्षतेखाली **दिनांक ../०८/२०१८ रोजी सकाळी/दुपारी......... वाजता** विद्या विभाग, इमारत क्र. ३, पहिला माळा, छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे आयोजीत करण्यात आलेली आहे.

## सभेची कार्यक्रम पत्रीका

**बाब क्रमांक १ : हिवाळी २०१८** मध्ये होणाऱ्या परिक्षेसंबधी कार्याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम ४१(च) अंतर्गत दिलेल्या पुढील तरतुदीनुसार **"विद्यापरिषदेने निर्धारित केलेल्या निकषांच्या आधारे विद्यापीठीय परिक्षा व मुल्यमापन यासाठी प्राश्निक, परीक्षक आणि नियामक यांची नामिका तयार करणे आणि परिक्षा व मुल्यमापन मंडळाकडे त्यांची शिफारस करणे."**

**बाब क्रमांक २** : सध्या सुरू असलेल्या वार्षिक एम.फील अभ्यासक्रमाचे रूपांतर सत्र पध्दतीत करण्याबाबत व्यस्थापन परिषदेणे दिनांक १२ ऑगस्ट, २०१६ रोजी बाब क्रमांक १५४ नुसार घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावनी व नियमावली तयार करून विद्यापरिषदेला शिफारशित करणे.

**बाब क्रमांक ३** : उच्च शिक्षण घेणा–या दिव्यांग विद्यार्थ्यांना परिक्षेमध्ये सोयी–सवलती देण्याबाबत महाराष्ट्र शासनाने दिनांक ४ मार्च २०१७ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार नियमावली तयार करून अधिष्ठाता मंडळाकडे शिफारशीत करणे.

(सहपत्र पटलावर ठेवण्यात येईल)

**बाब क्रमांक ४** : उच्च शिक्षण संचालनालयाच्या कार्यकक्षेत येणा–या महाविद्यालयातील रोजगारक्षम नसलेल्या अथवा कालबाहय झालेल्या अभ्यासक्रमांचा आढावा घेण्याबाबत विचारकरून कालबाहय व रोजगारक्षम नसलेला अभ्यासक्रम निहाय अहवाल विद्यापरिदेला शिफारशीत करणे.

(सहपत्र पटलावर ठेवण्यात येईल)

आपणांस विनंती करण्यात येते की, वर कळविल्याप्रमाणे आपण सभेला उपस्थित रहावे.

(डॉ.अनिल हिरेखन)
उपकुलसचिव (विद्या)